<u>नि.फौ.ख.क्र. ७७८/२०२२</u> <u>नि.क्र.</u>

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे आरोपीचे निवेदन</u>**

आरोपी क्र. १ चे नाव : अशोक भानुदास गिते
वय : २३वर्षे
राहणार : सौरभ कॉलनी, अहमदनगर

आरोपी क्र. २ चे नाव : सोमनाथ भानुदास गिते
वय : २७ वर्षे
राहणार : सौरभ कॉलनी, अहमदनगर

[टिपः– संबंधित प्रश्न तयार करणेकामी प्रस्तुत न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३(५) नुसार अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती सीमा शेख आणि आरोपीतर्फे वकील श्री. ए. डी. गर्जे यांचे सहाय्य घेतले असून, माननीय सर्वोच्च न्यायालयाचे राज कुमार वि. सरकार 2023 SCC OnLine SC 609 मधील न्यायनिर्देशांची पूर्तता केलेली आहे.]

प्र.क्र. १ तुमच्या विरुध्द आलेल्या पुराव्याबाबत आपणास खालील प्रश्न विचारण्यात येत असून त्याची उत्तरे देणे तुम्हास बंधनकारक नाही आणि प्रश्नाची उत्तरे न दिल्यास तुमच्यावर कोणतीही कारवाई होणार नाही. परंतु प्रश्नाच्या उत्तरात आपल्या विरूध्द एखादी बाब आढळून आल्यास ती बाब पुरावा म्हणून ग्राहय धरण्यात येईल. सदरची बाब तुम्हास समजली काय ?

उत्तर. आरोपी क्र. १ होय. आरोपी क्र. २ होय.

प्र.क्र. २ सरकार पक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या साक्षीदारांची साक्ष आपणास समजली काय ?

उत्तर. होय. होय.

प्र.क्र. ३ **अभियोग पक्षातर्फे फिर्यादी साक्षीदार क्र.१ श्री. पांडुरंग मारुती काळे** यांच्या साक्षीत असे आले आहे की, ते श्रेयस नगर, तपोवन रोड येथे राहायला आहेत. त्यांच्या घरासमोर मोठे पटांगण आहे आणि घटनेनंतर ते तुम्हाला

ओळखायला लागले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. नाही नाही

प्र.क्र. ४ त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, दि. २१/०१/२०२२ रोजी संध्याकाळी ५.३० वा. ते घरी आले व जेवण केले त्यावेळेस त्यांची मुलगी बाहेर भांडे घासत होती तेव्हा पटांगणात तुम्ही आणि तुमचे सोबत असलेले चार ते पाच लोकांचे भांडण सुरु होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर नाही नाही

प्र.क्र. ५ त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांनी तुम्हाला भांडण करु नका असे म्हटले असता तुम्ही त्यांना शिवीगाळ व धक्काबुक्की केली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. नाही नाही

प्र.क्र ६ त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, अर्ध्या तपासानंतर तुम्ही तुमचा भाऊ सोमनाथ व आठ ते दहा लोकांसह घरात घुसले आणि त्यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यामध्ये त्यांना मुका मार लागला, त्यांची मुलगी भांडण सोडवायला आली असता तिलापण शिवीगाळ केली आणि आमच्या नादी लागला तर जीवाने मारुन टाकु अशी धमकी दिली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. नाही नाही

प्र.क्र ७ त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यामुळे त्यांनी तुमच्या विरुध्द फिर्याद(नि. ११) दिली, तसेच घटनास्थळ पोलिसांना दाखविले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटी फिर्याद दिली आहे. खोटी फिर्याद दिली आहे.

प्र.क्र. ८ अभियोग पक्षाचे साक्षीदार तुमच्या विरुध्द साक्ष का देतात ?

उत्तर. माहित नाही. माहित नाही.

प्र.क्र. ९ तुम्हाला शपथेवर जबाब दयावयाचा आहे का ?

उत्तर. नाही नाही

प्र.क्र. १० तुम्हाला बचावाचे साक्षीदार तपासावयाचे आहेत काय ?

उत्तर. नाही नाही

प्र.क्र. ११ तुम्हाला या केसबाबत आणखी काही जादा सांगावयाचे आहे काय ?

उत्तर. खोटी केस दाखल केली आहे. खोटी केस दाखल केली आहे.

--------------

आरोपी क्र. १ ची सही / अंगठा

--------------

आरोपी क्र. २ ची सही / अंगठा

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.03.17 18:12:04 +0530

(एल. एस. पाढेण)

मुख्य न्यायदंडाधिकारी

दिनांक : १७/०३/२०२६ अहमदनगर.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीचा जबाब माझ्या समक्ष नोंदविला असून त्यातील मजकूर हा आरोपीने कथन केल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.03.17 18:12:12 +0530

(एल. एस. पाढेण)

मुख्य न्यायदंडाधिकारी

दिनांक : १७/०३/२०२६ अहमदनगर.